॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. परीक्षा/समन्वय/पुर्नपरीक्षा/२०२५-२६/८९०६ दिनांक : ०९/०५/२०२६

## अतिरिक्त (Additional) परीक्षेसंबंधी परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य,
पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त (Additional) परीक्षे बाबत.
संदीर्भ : महाराष्ट्र शासनाच्या विविध MHCET-2026 परीक्षासंबंधाने समन्वय/उ.प.२०२६/२०२५-२६/८७५४ दि. ०२/०४/२०२६ रोजीचे परिपत्रक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ च्या पदवी व पदव्युत्तर (नियमित व बॅकलॉग) अभ्यासक्रमाच्या परीक्षेदरम्यान ज्या विद्यार्थ्यांनी **क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व विद्यार्थी कल्याण (DSW) विभागाव्दारे** आयोजीत करण्यात आलेल्या स्पर्धेत सहभाग घेतला असल्यामुळे सदर परीक्षा देऊ शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे अतिरिक्त परीक्षेबाबतचे प्रस्ताव **संचालक, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व विद्यार्थी कल्याण (DSW) विभागाकडे दाखल केलेले आहेत** त्या विद्यार्थ्यांच्या **तसेच संदर्भीय पत्रानुसार जे विद्यार्थी** महाराष्ट्र शासनाच्या विविध MHCET-2026 परीक्षेस बसलेले असल्यामुळे **प्रस्तुत विद्यापीठाची उन्हाळी-२०२६ ची पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या त्या दिवशीच्या परीक्षेस अनुपस्थित राहिले आहेत अशा विद्यार्थ्यांची** परीक्षा दिनांक १२ मे २०२६ पासून सुरु होणा-या अतिरिक्त (Additional) परीक्षेसोबत घेण्यात यावेत.

उपरोक्त पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त (Additional) परीक्षा संबंधीत विद्यार्थ्याच्या प्रवेशीत महाविद्यालयामध्ये घेवून संबंधीत विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करून मूळ गुण यादया उत्तरपुस्तिकांसह केंद्रीय मूल्यांकन केंद्रामध्ये सादर करावेत. सदर अतिरिक्त (Additional) पदवी व पदव्युत्तर परीक्षेचे वेळापत्रक (कला, वाणिज्य व विज्ञान) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

उन्हाळी-२०२६ च्या परीक्षेसाठी निर्गमित करण्यात आलेल्या प्रवेशपत्रावरच अतिरिक्त (Additional) परीक्षा (ज्या विषयाकरीता अनुपस्थित होते त्याच विषयाच्या परीक्षेस) देण्यास परवानगी राहिल. सदरील विद्यार्थ्यांची उपस्थिती ही ऑफलाईन पध्दतीने घेण्यात यावी. सदर परीक्षेचे LAC उपलब्ध करून देण्यात येणार नाही. परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका प्रश्नपत्रिका नियमित परीक्षेप्रमाणे ऑनलाईन पोर्टलमधून त्या त्या दिवशी डाउनलोड करून घ्यावी.

उपरोक्त प्रश्नपत्रिका डाउनलोड करणे किंवा इतर बाबीसाठी काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास QPD Support Team Mobile No. **07948223030** यांच्याशी संपर्क साधावा. यानंतरही समाधान न झाल्यास अधिक्षक, कला/वाणिज्य/विज्ञान/ विभाग व संगणक कक्षातील सिनीअर प्रोग्रामर डॉ. विलास साळवे यांच्याशी संपर्क साधावे.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
**मा.संचालक, क्रीडा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ**
**मा.संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, प्रस्तुत विद्यापीठ**
**मा.संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.**
**सदर पत्र उपरोक्त संचालकांना देवून कळविण्यात येते की, आपण सादर केलेल्या प्रस्तावातील विद्यार्थ्यांना व प्राचार्यांना अतिरिक्त (Additional) परीक्षेच्या तारखेबाबत आपल्या स्तरावरुन सुचित करावे.**